**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**उन्हाळी २०२२ पर्यावरणशास्त्र नियमित व माजी विद्यार्थांना परीक्षेचे आवेदनपत्र सादर करण्याबाबत सूचना**

**संबधित विद्यार्थ्यांनी नोद घेण्याचे आवाहन**

अमरावती.

पर्यावरणशास्त्र विषयाच्या नियमित व माजी विद्यार्थांना अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्यावतीने सूचित करण्यात येते की, उन्हाळी - २०२२ मध्ये होणाऱ्या पर्यावरणशास्त्र परीक्षेकरीता ज्या विद्यार्थांनी अद्यापपर्यंत पर्यावरणशास्त्र परीक्षेकरीता आवेदनपत्रे सादर केली नसतील, अशा विद्यार्थांनी आपल्या महाविद्यालयाशी तात्काळ संपर्क साधून परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची आहेत.

**४ जुलै २०२२ अंतिम तारीख**

पर्यावरणशास्त्र परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठी दि. ४ जुलै, २०२२ अंतीम तारीख विद्यापीठाने ठेवली असून संबधित विद्यार्थांनी उन्हाळी परीक्षा - २०२२ पर्यावरणशास्त्र करीता आवेदन पत्र सादर करण्याचे आवाहन विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

**महाविद्यालयांनी संबधित विद्यार्थांना कळवावे**

विद्यापीठाच्यावतीने सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभाग आदींना उन्हाळी - २०२२ पर्यावरणशास्त्र या परीक्षेकरीता नियमित व माजी विद्यार्थांचे आवेदनपत्र ४ जुलै, २०२२ पर्यंत विद्यार्थांकडून स्वीकारण्याबाबत आणि स्वीकारलेले आवेदनपत्र महाविद्यालयांनी विहीत तक्त्यात भरून परीक्षा विभागातील संबधित परीक्षा लिपिकाकडे दि. ६ जुलै, २०२२ पर्यंत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच संबधित शिक्षकांनी याबाबत संबधित विद्यार्थांना माहिती द्यावयाची असून त्यांच्याकडून आवेदनपत्रे भरुन घ्यावयाची आहेत.

विद्यार्थ्यांनी अधिक माहिती करीता आपल्या महाविद्यालयासोबत तात्काळ संपर्क साधावा व पर्यावरणशास्त्र परीक्षेकरीता आवेदनपत्रे विहीत मुदतीत सादर करावीत, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २८/०६/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/